MHKO100007152011

**नियमीत दिवाणी दावा क्र. २३४/२०२२**

गजबर परीट वगैरे.
विरुध्द
बियामा परीट.

**निशाणी क्र.२८ वर आदेश**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ६, नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीतर्फे सदर अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. वादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, त्यांनी प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीने दाव्यात हजर होऊन आपली कैफियत दिलेली आहे. दावा मिळकत ही वादी यांच्या मालक नात्याच्या कब्जे वहिवाटीस आहे असे कथन वादी यांनी दाव्यात घेतलेले आहे. याऊलट, प्रतिवादीने दावा मिळकत ही मिरासोची पत्नी म्हणून मिरोसोच्या मृत्यूनंतर वारसा हक्काने तिच्या ताब्यात आहे असे कथन केले आहे. प्रतिवादीचे पती मिरासो हे वादीचे चुलते होते व प्रतिवादी ही वादीची चुलती आहे. प्रतिवादी हिला कोणतेही मुलबाळ नाही. मिरोसोच्या मृत्यूनंतर वादी व प्रतिवादी हेच सरळ वारस होतात. प्रतिवादीला मिरोसोच्या मृत्यूनंतर दावा मिळकतीमध्ये १/४ एवढा हिस्सा येतो व उर्वरित ३/४ हिश्यास वादी यांची मालकी येते. सदरचे मुद्दे हे कायदेशिर मुद्दे असलेने अनावधानाने दाव्यात कथन करणेचे राहून गेले आहे. त्यामुळे, वादी यांनी अर्जामध्ये नमुदप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मागितली. प्रस्तुत दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सदरची दुरुस्ती मंजूर न झाल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, वादी यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०३. प्रतिवादी यांनी अर्जाचे मागील पानावर म्हणणे दिले व असे कथन केले की, सदर अर्जातील संपूर्ण कथने खोटी व चुकीची आहेत. अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास रक्कम रु. ५,०००/- खर्चाची मागणी केली.

०४. प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. मुळ दाव्यात वादींनी ते दावा मिळकतीचे हक्कसोडपत्राप्रमाणे मालक असल्याचे हक्कज्ञापन होऊन मिळणेकरीता मागणी केलेली आहे. प्रस्तुत अर्जाप्रमाणे वादी यांनी सदर हक्कसोडपत्राप्रमाणे वादी यांची पुर्णतः मालकी शाबीत न झालेस त्यांचा सदर मिळकतीमधील प्रतिवादी हिचा हिस्सा वगळता उर्वरित सर्व हिस्सा वादी यांचे मालकीचा असलेबाबत दुरुस्तीची मागणी केलेली आहे. सदर प्रस्तावित दुरुस्ती पाहता ती मुळ दाव्यातील कथनाशी सुसंगत असून त्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलणारे नाही. तसेच, सदर दुरुस्ती ही केवळ वादी व प्रतिवादी यांचे मालकीबाबत कायद्यानुसार हिश्यासंदर्भात असून सदर दुरुस्ती ही दाव्याच्या गुणदोषावरील निकालाकरीता आवश्यक आहे. त्यामुळे, सदर दुरुस्ती केलेस प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याऊलट, दावा हा गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. सबब, प्रस्तावित दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: <u>आदेश</u> :-**

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. वादी यांनी अर्जात सुचविलेली दुरुस्ती १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये करुन त्याअनुषंगाने दुरुस्त दाव्याच्या प्रती न्यायालयात सादर कराव्यात.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.07.18 17:34:55 +0530

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १८/०७/२०२३.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 18/07/2023 |
| Order signed by P.O. on | 18/07/2023 |
| Order uploaded on | 18/07/2023 |